(Marathi)

1018
9181

1328 — 20 P

Swarajyacha Mahamantra in Marathi
(2 copies)

1328

1328

# स्वराज्याचा
# महामंत्र.

## महात्मा गांधी.



पी. बी. पाठक महात्मा एजन्सी मुंबई ४
किंमत १ आणा.

IMPERIAL RECORD DEPARTMENT
RECEIVED.
21 JAN. 1931

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1328
Date 11.1.72
GOVT. OF INDIA

# स्वराज्याचा महामंत्र

चाल ( धन्य शिवाजी किंवा चंद्रकांत राजाची कन्या या चा. )

स्वराज्याचा महामंत्र **हा पठण** करा जन हो ।
देश–पुढारी–श्रेष्ठजनांच्या आज्ञा ऐका हो ॥ १ ॥
गांधी, नेहरु यांसम गाजी तुमचे असतां हो ।
एक जुटीनें असहकारिता व्रत हें पाळा हो ॥
स्वातंत्र्यानें आर्यभूमिचें नांवचि राखा हो ।
धर्मनीतिनें एकजुटीनें कंबर बांधा हो ॥ ३ ॥
परदेशीचा त्याग करोनी स्वदेशीच घ्या हो , ।
स्वणभूमि ही झाली भिकारी लाजचि राखा हो ॥ ४ ॥

२

कापुस येथें पिकुनी सारा परदेशीं जातो ।
कपडा त्याचा परदेशी तो परत कसा येतो ! ॥ ५ ॥
त्यांतचि अमुचा किति तरी पैसा परदेशीं गेला ।
भीकहि येण्या कारण दुसरें आळशि जन बनला ॥ ६ ॥
परकी यंत्रें आलीं ह्मणुनी धंदे हे बसले ।
धंदे नसतां आळशि बनलों भिकारपण आलें ॥ ७ ॥
फिरतिल जरि कां यंत्रे ऐशीं जगांत हीं सारीं ।
आळशी बनुनि जन हे भिक्षा मागतील भारी ॥ ८ ॥

भीक न मिळतां चोऱ्या, माऱ्या लूट बहू करुनी ।
अनीतिनें ते भरतिल पोटें जाणा हें स्वमनीं ॥ ९ ॥
यास्तव पाश्चात्यांचीं यंत्रें नको आह्मा स्पष्ट ।
सांगाया अजि चुकतिल तरि मग पुढील ते कष्ट ॥ १० ॥
धट्ट कट्ट हे आर्य वीरहो सोडुनि घरदार ।
भिक्षा मागति धंदे नाहीं सोडुनि परिवार ॥ ११ ॥
त्यांना शिकवा धंदे कांहीं उद्योगा लावा ।
रहाट फिरवुनि सूत काढुनी कापडही विणवा ॥ १२ ॥
आर्यवर्ती तलम मलमल डाक्का शहराची ।
नष्ट पावली काय कहाणी झाली ही अमुची ॥ १३ ॥
आळशी बनुनि स्थस्थ बैसलां भिक्षा ही आली ।
झालां जरि हो सर्व भिकारी कोण तुह्मां वाली ॥ १४ ॥

३

कोहिनूर—सम रत्नें तुह्मी दान कुणा दिधलीं ।
किंवा कोणी धन—तृष्णेनें लुटुनि कशीं नेलीं ॥ १५ ॥
शिल्पकला ती सारी कीं हो विसरुनि तुह्मि गेलां ।
परदेशीच्या नादानें हो मूढ कसे बनलां? ॥ १६ ॥
परदेशीच्या व्यापारानें पारतंत्र्य आलें ।
समजुनि बांधा खूण गांठा कीं यश तुह्मां आलें ॥ १७ ॥
परदेशीच्या व्यापारास्तव आश्रय ज्यां दिधला ।

त्या लोकांनीं स्वार्थपणानें देशचि नागविला ॥ १८ ॥
क्षुल्लक काड्यांची ती पेटी परदेशी असते ।
त्याहुनि बरवी चकमक ती हो खरोखरी गमते ॥ १९ ॥

४

साखर सारी परदेशाची चहा तसा दुष्ट ।
पैसा आमुचा नेला त्यांनीं होत बहुत कष्ट ॥ २० ॥
मळेवाले देशबंधुना गुलाम हो करिती ।
चहापायीं फिजीं, असामीं त्यांना राबविती ॥ २१ ॥
त्यांची कांहीं लाज धरुनि चहाचि सोडा हो ।
मुदतबंदीची दुष्ट गुलामी बंदाचि पाडा हो ॥ २२ ॥
चहासाठीं कितितरि पैसा परदेशीं जातो ।
पैसा नाहीं रक्तचि अपुलें शोषुनि तो नेतो ॥ २३ ॥
उपवासाचा दीन म्हणोनि चहा बहुत घेतां ।
पुण्यचि नाहीं पापचि केवळ फार तुह्मी करितां ॥ २४ ॥
देश आपुला उष्णचि असतां चहा नको येथें ।
चहापायीं काळिज तुमचें करपुनि हो जातें ॥ २५ ॥
विडी सिगारा सोडुनि द्या हो धूम्रपान व्यसनें ।
जीवहि होतो खोकुनि खोकुनि कासाविस त्यानें ॥ २६ ॥
क्षय दमादी लागति तुह्मां रोग भयंकर हे ।

दुर्व्यसनें हीं कारण यांतें जाणा सत्यचि हें ॥ ७ ॥

५

धर्मा मध्यें दारु पिणें हें पाप खरें असतां ।
पिऊनि कां हो श्रेष्ठ गुरूंनां सांगा लाजवितां ॥ २८ ॥
मद्य पिऊनी गुंगीमध्यें धुंद तुह्मी बनतां ।
निजबंधूंना दुखवुनि जन हो पाप किती करितां ॥ २९ ॥
मद्य पिऊनी मस्त बनुनी अपशब्दाचि वदतां ।
निज भगिनींची अब्रु लुबाया लाज कशि न धरितां ॥ ३० ॥
दारू पायीं अनीतीचा हा पगडा जो बसतो ।
त्या योगानें गर्दभाहुनी गर्दभ जन बनतो ॥ ३१ ॥
गुंगीमध्यें खेळ तमाशा खर्च किती करितो ।
पैसा नसतां चोरी लबाडी खून तसे करितो ॥ ३२ ॥
अनीतीचें हें द्योतक दारू जनहो तुह्मीं सोडा ।
दारू पिण्या उपदेशी जो मारा त्या त्या जोडा ॥ ३३ ॥
बंद कराया मद्यपान जे उपदेशा करिती ।
शहाणे मोठे अधिकारी हे शिक्षा त्या देती ॥ ३४ ॥
सत्यप्रिय हे इंग्रज ह्मणुनी गाती पोवाडे ।
त्याचें कांहींच उमगत नाहीं जनते हें कोडें ॥ ३५ ॥
धर्मासाठीं देशासाठीं दारू सोडुनि या ।
उद्देशायां आर्य वीरहो धाउनि पुढते या ॥ ३६ ॥

( ६ ) दुष्टपणानें यास्तव तुह्मा शिक्षा जरि दिधली ।
तरी नीतिच्या तत्वासाठीं माना ती तसली ॥ ३७ ॥
डायरसम, जे राक्षस असती त्यां कां घाबरतां ।
घेतिल जरि कां जीवहि तुमचा तरि कां हो रडतां ॥ ३८ ॥
निजहक्कास्तव अर्थ वीरहो धावुनि सारे या ।
शस्त्र न धरितां न्याय नीतिनें स्वराज्य मिळवूं या ॥ ३९ ॥
शस्त्राहुनि हें असहकारिता अस्त्र असे मोठें ।
सत्याग्रह तरवारीनें मग हटतील सोटे ॥ ४० ॥
सोटेशाही करूं नका हो नका करूं दंगा ।
हटवा दुष्टाचि शत्रू गमले धरुनी सत्संगा ॥ ४१ ॥
परकीयांचें गुलाम केवळ लाज कशि न धरितां ।
स्वतंत्रासी गुलाम करण्या शस्त्र कशा धरितां ॥ ४२ ॥
गांधीसम हे वीर खरोखर नरश्रेष्ठचि असतां ।
नौकरशाहीस भिऊनि तुह्मी जन कांहो घाबरतां ॥ ४३ ॥
( ७ ) आंग्ल भूमिचे राजपुरुष हे ह्या देशीं अणिती ।
व्यर्थचि अमुचा उधळुनि पैसा खर्च किती करिती ॥ ४४ ॥
या योगानें कष्ट खरोखर आर्य जनां होती ।
नौकरशहिस कांहीं न त्याचें चैन मजा करिती ॥ ४५ ॥
अन आमंत्रित राजपुरुष हे येथ कशा येती ।
फसवुनि आमुच्या भोळ्या लोकां काय आह्मां देती ॥ ४६ ॥
( ८ ) स्वार्थचि आपुला सांधाया जे मीचपणा करिती ।

निजराष्ट्राचा घात करोनी नामदार बनती ॥ ४७ ।
नीज बंधूंशीं सख्य न करितां दुष्टपणा करिती ।
स्वार्थासाठीं नौकर बनुनी मूर्खपणा करिती ॥ ४८ ॥
स्वार्थपरायण अतिलोभानें गुंग किती बनती ।
अन्यायाशी न्याय ह्मणाया लाज कशि न धरती ॥ ४९ ॥
अन्यायाची राजपद्धीत ह्या देशीं असतां ।
नौकर तीचे बनुनी तुह्मी जन अन्यायी बनतां ॥ ५० ॥
पोटाची ही खांच भराया लांच कशी खातां ।
खाकी काळा ड्रेस करोनी निजबंधू छाळितां ॥ ५१ ॥
हाय ! हाय ! यां देशबंधुहो नावच देण्याला ।
लाजहि वाटे आह्मा तैसी भारत मातेला ॥ ५२ ॥
( ९ ) सद्धर्मी शिवछत्रपती प्रिय आर्य जनां झाला ।
एकजुटीनें देश–धर्म हा तेणे रक्षियला ॥ ५३ ॥
शिवरायाच्या पुण्याईनें छत्रपती बनले ।
अनीतिचें तें सत्र चराया मार्ग वहू अखले ॥ ५४ ॥
सत्यशोधक अज्ञ खरोखर तमासगिर सजले ।
निंद्य नीतिच्या महावीराचें सैन्य खडें बनलें ॥ ५ ॥
शिवरायानें धर्मनीतिनें स्वदेश सुखि केला ।
सर्व जनांची एकि करोनि उद्धारचि केला ॥ ५६ ॥
अज्ञ विरांच्या काय कथाव्या गमती यापुढती ।
देशबंधुंची जूट फुटाया यत्न किती करिती ॥ ५७ ॥

व्युरोक्रसीचा अधार ह्मणुनी रंग जसे करिती ।
तमासगिर हे मुर्खशिरोमणी नाचा नाचविती ॥ ५८ ॥
सरस्वतींची सेवा न करितां ढंग असे करिती ।
अज्ञ जनांची फूट करोनी देशद्रोह करिती ॥ ५९ ॥
आणिबाणीच्या वेळप्रसंगीं विचार सोडोनी ।
मातृभूमिची सेवा न करितां करिती हे हानी ॥ ६० ॥
निजहक्काच्या प्राप्ती साठीं सन्मार्गचि मुधरा ।
हीन–दिनानो विद्या शिकुनी आत्मोद्धार करा ॥ ६१ ॥
राष्ट्रसभेसी सख्य करोनी निज हक्कां मिळवा ।
एक जुटीनें भरतभुमिची करा तुह्मीं सेवा ॥ ६२ ॥
(१) आर्य वीर हो सत्यासाठीं शिक्षा जरि दिधली ।
तरि प्राणाची पर्वा न करा भोगा ती तसली ॥ ६३ ॥
शस्त्र न धरितां आत्मिक बल हें वाढवुनि अपुलें ।
सहन करा हो शूरपणानें प्रसंग हे असले ॥ ६४ ॥
आत्मा आहे अमर खरोखर तत्वचि जाणा हें ।
त्यातें नाहीं बंधन शिक्षा सत्यचि ऐका हें ॥ ६५ ॥
शरीर गमतें मढेंच केवळ शिक्षा भोगाया ।
परि आत्मा तो स्वतंत्र आहे सत्यचि शोधाया ॥ ३६ ॥
मी, तूं केवळ झूट पसारा परब्रह्म ( चि ) सारा ? ।
मग भीतीला उरला कोठें सांगा जन धारा ? ॥ ६७ ॥
सर्वचि साचे अंश प्रभूचे एक तुह्मीं असतां ।

माझें, तुझें म्हणुनी दुजे कांहो जन बनतां ॥ ६८ ॥
हीन दिनातें मदत करा जन कींव करा त्यांची ।
विनती आहे हीच तुह्मांला साधू—भजनांची ॥ ६९ ॥
गांधीसम हे श्रेष्ठ मुनी जन हेंच तुह्मां कथिती ।
हीन दीन जे असती त्यांनां मदत करा पुरती ॥ ७० ॥
नीच उच्च हे भेदपसारे अज्ञानचि सारें ।
शरीर पडतां एकरूपतां भेद कसा मग रे ॥ ७१ ॥
अज्ञ हिनातें सूज्ञ करोनी सुजन तुह्मी बनवा ।
भेदभाव हा झूटपसारा, समजुनि जन घ्यावा ॥ ७२ ॥
ज्ञानप्रसारा करा तुह्मी जन स्वार्थचि सोडोनी ।
हिंदु—मुसलमान, नीच—उच्च हे भेदचि सोडोनी ।
अर्पुनि आपुला प्राण प्रसंगीं राखा निज जननी ॥ ७४ ॥
अनीतिचे ते मार्गहि सोडा सत्यानें चाला ।
खोट्या नटया रूढीवरी जन घाला तुह्मी घाला ॥ ७५ ॥
नश्वर जग हें जाणुनि सारें धीर धरा पूर्ण ।
परोपकारीं शरीर झिजवा सोडुनि अभिमान ॥ ७६ ॥
आर्यावर्ती सर्व जनांना नम्र विनंती हो ।
एकजुटीनें देशकार्य हें करा तुह्मी जन हो ॥ ७७ ॥
स्वराज्यास्तव महामंत्र हा गहन जरी गमला ।
जगदीशाचि कृपाप्रसादें गंगासुत वदला ॥ ७८ ॥
ऐकाया ही अल्प कविता धावुनि जन याहो ।
स्वराज्य मिळवुनि स्वराज्यास्तव देहचि झिजवाहो ॥ ७९ ॥

॥ वंदे मातरम् ॥

॥ श्रीधन्वन्तरयेनमः ॥

मराठी भाषेत वैद्यकीचा सचित्र प्रचंड ग्रंथ.

वैद्यराज कृष्णशास्त्री भाटवडेकर कृत.

# वैद्यसार संग्रह.

हा ग्रंथ सर डॉ. भालचंद्र यांचे वडील विद्वान वैद्यराज कृष्णशास्त्री भाटवडेकर, वैद्यराज रघुनाथ शास्त्री दातें व आयुर्वेद महोपाध्याय वासुदेवाचार्य ऐनापुरे यांनी उपयुक्त अनुभविक देशी औषधांची माहिती भरपूर देऊन तयार केला आहे. यांत रोगांचें निदान, स्त्रीरोग, बालरोग यांची चिकित्सा संगतवार दिली असून उत्तमोत्तम रसायनें, कर्म-विपाक, अनुपान, गर्भाची व इतर माहिती सचित्र असल्यानें देशी औषधांचा लोकमान्य ग्रंथ संग्रहीं अवश्य ठेवून डॉक्टरांची बिलें वाचवा व स्वतःच घरीं वैद्य बना. सवलतीची किंमत रुपये १॥, शिवाय पोष्ट व्ही. पी. खर्च माफ.

पी. बी. पाठक आणि कंपनी.

महात्माएजन्सी, ठाकुरद्वार नाका,

गिरगांव रोड, मुंबई नं. ४.